नि.क्र. १२

MHBU150011172021

## न्यायनिर्णय

(११.०३.२०२६ रोजी घोषित)

**०१.** खालील मुद्दे माझ्यासमोर उपस्थित झाले. त्यावरील कारण-मिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्ष सिद्ध करतो काय की, आरोपीच्या ताब्यात १८० एमएलच्या ४१ नग देशी दारूच्या बाटल्या विनापरवाना व अवैधरित्या मिळुन आल्या? | **नाही.** |
| ०२. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**का र ण मि मां सा**

**०२.** आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने खालीलप्रमाणे एका साक्षीदारांची साक्ष नोंदविली व इतर कोणतेही साक्षीदार तपासले नाही.

१. सा.क्र.०१ अमोल शेषेराव अवचार , (फिर्यादी) नि.क्र.१२ लगत,

**०३.** खटला चालवित असतांना आरोपीविरुद्ध गुन्ह्यासंदर्भात काही विधाने आलेली असल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ (१)(ब) प्रमाणे आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले. त्यामध्ये आरोपीचा बचाव असा आहे की, त्यावर खोटी केस केली. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. ०१ व ०२ करीता**

**०४.** आरोपीवरील दोषारोप सिद्ध करतांना अभियोग पक्षाला प्रामुख्याने हे सिद्ध करावे लागेल की, आरोपी हा त्याच्या ताब्यात १८० एमएलच्या ४१ नग देशी दारूच्या बाटल्या विनापरवाना अवैधरित्या विक्री करण्याच्या हेतुने बाळगतांना मिळुन आला व त्याच्या ताब्यातुन १८० एमएलच्या ४१ नग देशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. त्यासाठी अभिलेखावर अभियोग पक्षातर्फे आलेल्या तोंडी पुराव्याचे अवलोकन करणे गरजेचे आहे. आरोपीच्या कब्जातुन मादक पदार्थ वा द्रव्य मिळाले व जप्त झाले हे प्रस्थापित करण्यासाठी

अभियोग पक्षाने साक्षीदार आणणे आवश्यक होते.

**०५.** त्याप्रमाणे सा.क्र.०१ अमोल शेषेराव अवचार , (फिर्यादी) नि.क्र.१२ लगत यांच्या साक्ष नोंदवली. त्यांनी पुराव्यादरम्यान असे कथन केले की, घटना दि. १७/०९/२०२१ रोजी १७.०० वाजण्याच्या सुमारास घडली होती. त्यादिवशी गुप्त बातमीदार यांच्याकडून माहिती भेटली की, देऊळगांव मही येथे आरोपी देशी दारुची विक्री करत होता.माहिती मिळल्यानंतर कारवाई करण्याकामी दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क यांना घटनेची माहिती देऊन पंचासह ते आरोपीच्या घरी छापा टाकला असता आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्या घरातुन वायरच्या थैलीमध्ये देशी दारु मिळुन आली. आरोपीला त्याचे नाव व गाव विचारले असता त्याने दिलीप फुल्झारे असे सांगितले. आरोपीच्या ताब्यात असलेल्या थैलीचे घेतली असता, त्यामध्ये देशी दारु सिल बंद काचेच्या १८० एम.एल. च्या ४१ नग शिश्या एकूण किंमत अंदाजे २४७०/- रुपये च्या मिळून आल्या. तसेच ५० लि. पाण्याचा रांजण, २ स्टील ग्लॉस व एक प्लास्टीक मग असा एकुण ३७०/- रुपयाचा मुद्देमाल मिळुन आला. आरोपीस त्याच्या जवळ देशी दारु विक्रीचा परवानाबद्दल विचारले असता, त्याने त्याच्याकडे परवाना नसल्याचे सांगितले.तुमच्या ताब्यात असलेले शिश्या पैकी एक शिशीला पंचाचे व त्यांच्या सहीचे लेबल लावून जागेवर लाखेने सिल करुन सी.ए. तपासणी कामी ठेवण्यात आली. उर्वरीत मुद्देमाल जप्त करुन ताब्यात घेतला. आरोपीस सुचनापत्र देऊन सोडण्यात आले. पोलिस स्टेशनला येऊन त्याच्या विरोधात फिर्याद नि.क्र.१३ दाखल केली.घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेले एक शिशी सी.ए. सॅम्पल साठी वैज्ञानिक प्रयोगशाळा अमरावती येथे पाठविण्यात आला. साक्षीदाराचे जबाब नोंदविले. आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने त्याच्याविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले. ते आरोपीस ओळखतात. आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला. उलटतपासामध्ये त्याने हे मान्य केले की, दिनांक १७.०९.२०२१ रोजी त्याला कोणतीही माहीती मिळाली नाही व तो घटनास्थळी गेला नाही. तसेच त्याला जप्त मुद्देमालाचा लॉट, बॅच क्रमांक सांगता येत नाही.

**०६.** सा.क्र. १ ने अभियोग पक्षाच्या कथनांना समर्थन दिले असले तरी या प्रकरणातील घटनास्थळ व जप्ती पंच अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले नाही. तसेच प्रकरणातील मुख्य इतर साक्षीदार व तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविण्यात आली नाही व सरकार पक्षाच्या तोंडी विनंतीवरून प्रकरणामध्ये आणखी साक्षीदार तपासवयाचे नसल्याचे

कळवल्यामुळे नि.क्र. १ वर पुरावा बंदचा आदेश रितसर करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. तसेच अभिलेखावर रासायनिक विश्लेषनाचा अहवाल दाखल नाही. त्यामुळे, उपरोक्त नमुद दिनांक दिवशी आरोपीच्या ताब्यातुन ४१ नग देशी दारूच्या बाटल्या सिलबंद शिश्या आरोपीकडुन जप्त केले असल्याचे अभियोग पक्षाने संशयापलिकडे जाऊन सिध्द केले नाही.

**०७.** प्रस्तुत प्रकरणात सा.क्र. १ वगळता इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. घटनास्थळ व जप्ती पंच तसेच इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. तसेच सदर प्रकरणातील मुख्य इतर साक्षीदार यांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. त्यामुळे जप्त केलेला मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त केला होता याबाबत शंका व्यक्त होते. त्याचप्रमाणे रासायनिक विश्लेषणाचा कोणताही अहवाल अभिलेखावर दाखल केलेला नाही की, ज्यावरुन हे सिद्ध होईल की, आरोपीकडुन जप्त केलेला मुद्देमाल हा मादक द्रव्य अगर तत्सम गुणधर्म असलेला पदार्थ आहे. दारुबंदी प्रकरणात हे सिद्ध करणे आवश्यक होते की, आरोपीच्या कब्जात मादक द्रव्य अगर तत्सम गुणधर्म असलेले पदार्थ विनापरवाना सापडले होते. त्याबद्दल कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच विना परवानासाठी अभियोगपक्षाने कोणतेही प्रश्न साक्षीदाराला विचारलेले नाही.

**०८.** सारांश असा की, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ कलम ६५ (ई) अन्वये आरोप सिद्ध होण्यासाठी आरोपीच्या ताब्यात १८० एमएलच्या ४१ नग देशी दारूच्या बाटल्या विनापरवाना अवैधरित्या मिळुन आल्या ही बाब अभियोग पक्षाने संशयापलीकडे सिद्ध करणे गरजेचे आहे. परंतु अभियोगपक्षाने तपासलेल्या साक्षीदारांच्या पुराव्यावरुन ही बाब संशयापलीकडे सिद्ध होत नाही. अभियोगपक्षाने अभिलेखावर असे कोणतेही दस्त दाखल केले नाही की ज्यावरुन सिद्ध होईल की आरोपी हा अवैधरित्या विनापरवाना दारू विक्री करत होता. एकंदरीत सर्व पुरावे यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अभियोगपक्ष आरोपीविरुद्ध गुन्हा संशयापलीकडे सिद्ध करु शकलेला नाही. करीता मी, मुद्दा क्र. ०१ चा निष्कर्ष **नकारार्थी** नोंदवित आहे व मुद्दा क्र. ०२ च्या निष्कर्षाकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

०१. आरोपी **दिलीप विश्वनाथ फुल्लारे,** याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ कलम ६५ ई  च्या दंडनिय अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहीता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

०२. आरोपीचा वैयक्तीक मुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येतो.

०३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी रु. १५,०००/- किंमतीचा जामीन बंधपत्र सादर करावा.

०४. जप्त मुद्देमाल ४१ नग देशी दारूच्या बाटल्या  अपिलाचा कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता राज्य उत्पादन शुल्क, चिखली यांच्याकडे पाठविण्यात याव्यात.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

स्वा/-

दिनांक ११.०३.२०२६

**(श्री. हसीम मो. बेग)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र. २
देऊळगांव राजा.

**Certificate**

I affirm that, the contents of this PDF are same words to words, as per the original order.

Name of Clerk : S.N. Adhao

Name of Court : C.J.J.D. & J.M.F.C. Deulgaon Raja.

Upload on date : 12.03.2026